FORM-1A

N.C.R.B.

I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154193

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि.मुं पहिली खबर क्र. FIR No. 38, वर्ष Year 2022 दिनांक Date 16/09/2022

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र. अधि १९८८, कलमे Sections ७, ७ (अ)
   (ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day गुरूवार तारीख पासून Date from 08/09/2022 वेळ Time 11.00, तारीख पर्यंत Date to 15/09/22 वेळ Time 18:37
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 08/09/2022, वेळ Time 11.00
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 05/2022, तारीख Date 16/09/2022 वेळ Time 07:45

4. माहितीचा प्रकार Type of Information : ........, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा 10 किमि उत्तर पूर्व चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ........
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name सह दुय्यम निबंधक अंधेरी क्र.8 यांच्या कार्यालयाच्या आवारात, ठिकाणाचे नंबर No. if any ........, गल्ली Ward ........, रस्त्याचे नाव Name of road ........
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ........, गाव Village ........, पोस्ट Post ........, तालुका Taluka मुंबई उपनगर, जिल्हा Dist. मुंबई, राज्य State महाराष्ट्र
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name हरेश लक्ष्मण हरगुनानी (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name लक्ष्मण हरगुनानी
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 57 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9930448811
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........, दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation कार सेलिंग
   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........
   (h) पत्ता Address : 702, गल्ली / Ward, घर क्र./नाव House/Name No. सुन्दर शाईन सोसायटी, दूरध्वनी / भ्रमणध्वनी Phone/Mo. No. 16 वा रस्ता, पॅन क्र. PAN No. ........ वोटर्स नं. Card No. ........
   रस्त्याचे नाव Road प्लॉट क्र. 351, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place खार (पश्चिम), गाव Village मुंबई 400050, पोस्ट Post ........, पो. स्टे. P. Stn. ........
   तालुका Taluka ........, जिल्हा Dist. मुंबई उपनगर राज्य State महाराष्ट्र सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)
   1) संजय सोनु मालभाव वय-55 वर्षे, पद सह दुय्यम निबंधक, वर्ग-2, अंधेरी क्र.4, मुंबई 52
   2) खाजगी इसम कल्पेश दगडू गोळे, वय 38 वर्षे, धंदा-इस्टेट एजंट.
   3) खाजगी इसम संदीप सदाशिव देवघरकर वय 41 वर्षे, धंदा-इस्टेट एजंट.

Y.P.P.-800 Reg.-(25×6=150 Lvs.)-2-2018-PA3-(K) 829

Scanned with OKEN Scanner

यातील फिर्यादी हरेश लक्ष्मण हरगुनानी वय 57 वर्षे रा. बी. 702, स्वस्तिकलीन सोसायटी, 10 वा रोड, बांद्रा पश्चिम मुं- 400050 यांचा स्वतंत्र कागदावर नोंदविण्यात आलेली फिर्याद हीच गुन्ह्याची प्रथम खबर म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(इम्रान इनामदार)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
वरळी, मुंबई.

(हरेश लक्ष्मण हरगुनानी)

Scanned with OKEN Scanner

**फिर्याद** दिनांक :– १६/०९/२०२२

श्री. हरेश लक्ष्मण हरगुनानी वय ५७ वर्षे, धंदा : व्यवसाय, राठी : ७०२, एक्सरशाईन सोसायटी, १६ रस्ता, फ्लॉट क्र. ३५१, बांद्रा पश्चिम, मुंबई ५०, आधार कार्ड क्र. –७२६२१३३०१३१९, मोबाईल क्रमांक. ९९३०४४८८११, ९८२००५५०३१

मी वरील प्रमाणे असून वर नमुद पत्यावर सन १९९३ पासुन मी ,पत्नी निकिता ,मुलगा तनय व मुलगी डोयल असे मिळुन राहतो. मी सध्या जुन्या चारचाकी वाहने खरेदी–विक्रीचे काम करतो व यावर मिळणाऱ्या उत्पन्नावर माझा व माझे कुटुंबियांचा उदरनिर्वाह चालतो.

माझे मारवाडी चाळ, पहिला माळा,एस. व्हि. रोड, बांद्रा पश्चिम, मुंबई येथे खोली क्र. ८ व ९, अशा दोन खोल्या होत्या. सदरची चाळ ही रिडेव्हलपमेंट करीता सन २००६ मध्ये ग्रेस बिल्डर्स यांना देण्यात आली व चाळीचे नाव बदलुन ग्रेस बिल्डर्स असे देण्यात आले होते. सदर रिडेव्हलपमेंटचे काम पुर्ण होऊन मला माझ्या चाळीतल्या दोन खोल्यांच्या बदल्यात सदर बिल्डिंगमध्ये प्रत्येकी ३०० स्क्वेअर फुटाचे पहिला माळा, ग्रेस रेसिडेन्सी येथे युनिट क्र. १०३ व १०४ अशा दोन खोल्या बिल्डर परवेज लकडावाला रा.बांद्रा, मुंबई यांच्याकडुन मिळाल्या होत्या. सदर दोन्ही खोल्यांचे रजिस्ट्रेशन करण्याकरीता अंदाजे दोन महिन्यांपुर्वी मी सह दुय्यम निंबधक, वर्ग–२, अंधेरी क्र. ४, टेलिफोन एक्सचेंज, खार–पाली रोड, खार (प), मुंबई या कार्यालयात गेलो असता तेथे माझी प्रॉपर्टी कन्सल्टंट एजंट कल्पेश दगडु गोळे व संदिप सदाशिव देवघकर यांच्याशी भेट झाली. यावेळी त्यांनी मला रजिस्ट्रेशन करण्याकरीता लागणाऱ्या कागदपत्रांची यादी दिली. सदर कागदपत्रांची पुर्तता करुन मी पुन्हा त्यांना भेटलो असता, त्यांनी मला अजुन कागदपत्रांची पुर्तता करण्यास सांगितले. अशा प्रकारे मी त्यांनी सांगितल्याप्रमाणे संपुर्ण कागदपत्रांची पुर्तता करुन देखील त्यांनी मला वारंवार वेगवेगळया कागदपत्रांची मागणी करुन मला मानसिक त्रास देवु लागले. त्यानंतर मला एजंट कल्पेश दगडु गोळे व संदिप सदाशिव देवघरकर यांनी सांगितले की, सह दुय्यम निबंधक श्री. संजय सोनू मानभाव हे खोली रजिस्ट्रेशनचे कामामध्ये कायदेशीर अडचण असुन रजिस्ट्रेशनसाठी मोठया प्रमाणात स्टॅम्प डयुटी भरावी लागेल आणि जर स्टॅम्प डयुटी वाचुन रजिस्ट्रेशन करावयचे असेल तर त्यांना प्रत्येक खोलीचे पन्नास हजार असे मिळुन एकुण १,००,०००/– रुपये दयावे लागतील.

यानंतर दिनांक. ०७/०९/२०२२ रोजी वरील प्रमाणे एजंट कल्पेश दगडु गोळे व संदिप सदाशिव देवघकर यांनी माझे रजिस्ट्रेशनचे काम करण्यासाठी लाचेची मागणी केल्याने मला लाच देण्याची इच्छा नसल्याने मी सदरबाबत तक्रार करण्यासाठी दिनांक ०८/०९/२०२२ रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे लेखी तक्रार नोंदविली होती. माझ्या लेखी तक्रारीवरुन पोनि इम्रान इनामदार यांनी दोन शासकीय पंचाना बोलावून श्री. संजय सोनू मानभाव, सह दुय्यम निबंधक यांनी एजंट कल्पेश दगडु गोळे व संदिप सदाशिव देवघरकर यांच्यामार्फत माझ्याकडे लाच मागितली आहे किंवा कसे? याबाबत दिनांक ०८/०९/२०२२ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता, प्रथम दिनांक ०८/०९/२०२२ रोजी खाजगी एजंट संदिप सदाशिव देवघकर व एजंट कल्पेश दगडु गोळे यांनी माझेकडे दोन रूमच्या रजिस्ट्रेशनसाठी प्रत्येकी पन्नास हजार रुपये असे एकुण १,००,०००/– रोख रक्कमेच्या लाचेची मागणी केली होती. त्यावेळी एजंट संदीप याने त्याच्या उजव्या हाताच्या बोटांनी दोन वेळा पाच बोटे दाखवून पन्नस –पन्नास हजार रूपये असे एकूण एक लाख रू दयावे लागतील असे सागितले होते तसेच मी एजंट कल्पेश दगडु गोळे यांस श्री. मानभाव साहेबांना भेटून काही रक्कम कमी करता येईल का असे विनंती केली असता, एजंट कल्पेश दगडु गोळे यांनी मला श्री. मानभाव साहेबाशी भेटू न देता, तो स्वतः श्री मानभाव साहेबांशी बोलुन काही कमी होते का ते सांगतो असे मला सांगितले.

त्यानंतर दिनांक. १२/०९/२०२२ रोजी मी पुन्हा एजंट कल्पेश दगडु गोळे यास भेटलो असता, त्यांनी मला रजिस्ट्रेशन बाबत चर्चा झाली असुन साहेबानी प्रत्येकी ४०,०००/– रुपये असे एकुण ८०,०००/– रुपये रजिस्ट्रेशन करण्यासाठी दयावे लागतील असे सांगितले होते. यावर मी एजंट कल्पेश दगडु गोळे यांचेसह श्री. संजय सोनू मानभाव सह दुय्यम निबंधक अधिकारी यांची भेट घेवुन रक्कम कमी

करण्यास विनंती केली असता लोकसेवक श्री मानभाव यांनी नकार देवून एजंट च्या सांगणेवरून माझे कामामध्ये एक नांव असताना रजिस्ट्रेशन करीता दोन नांवे एडजेस्ट केली असल्याचे सांगितले. यावर मी त्यांना पहिल्या पासुन दोन नांवे होती असे सांगितले असता त्यांनी ठीक आहे यावर ते एजंट सोबत बोलतील असे सांगितले.

त्यानंतर दिनांक १३/०९/२०२२ रोजी मी पंचासमक्ष पुन्हा श्री. संजय सोनु मानभाव सह दुय्यम निबंधक अधिकारी यांची भेट घेवुन एजंट कल्पेश दगडु गोळे व संदिप सदाशिव देवघरकर यांनी मला सदर दोन खोल्यांचे रजिस्ट्रेशन करण्यासाठी प्रत्येकी पन्नास हजार रुपये असे एकुण १,००,०००/– मागितले असल्याचे व त्यामध्ये काही तरी रक्कम कमी करण्याची विनंती केली असता, त्यावर श्री. संजय सोनु मानभाव सह दुय्यम निबंधक अधिकारी यांनी मला ते याबाबत एजंटशी बोललेले आहेत, तुम्ही त्यांना भेटा असे बोलुन एजंट कल्पेश दगडु गोळे व संदिप सदाशिव देवघरकर यांनी माझ्याकडे वरील प्रमाणे मागितलेल्या लाचेबाबत श्री. संजय सोनू मानभाव सह दुय्यम निबंधक अधिकारी यांनी दुजोरा दिल्याचे निष्पन्न झाले. त्याबाबत सविस्तर पडताळणी पंचनामा केलेला आहे.

तसेच दिनांक १४/०९/२०२२ रोजी आरोपी क्र. २ यांने माझ्या मोबाईलवर फोन करुन दिनांक १५/०९/२०२२ रोजीचे १७:०० वा चे दरम्यान रजिस्ट्रेशनसाठी ठरल्याप्रमाणे ८०,०००/– रुपये घेवुन सह दुय्यम निबंधक कार्यालयात येण्यास सांगितले. परंतु आलोसे क्र. १ यांनी सदरचे रजिस्ट्रेशन हे पार्ले येथील निबंधक कार्यालयात करून घेण्यास मला सांगितले. मला आलोसे क्र १ हे वारंवार भेटल्याने त्यांनी रजिस्ट्रेशन करण्यास नकार दिल्याचे आरोपी क्र. २ यांनी मला सांगितले. यावर मी त्यांनी रजिस्ट्रेशन करून देण्यास आरोपी क्र. २ यांना विनंती केली असता त्यांनी दिनांक १५/०९/२०२२ रोजी तिन–चार वाजता रजिस्ट्रेशन करीता येण्यास सांगितले.

दिनांक १५/०९/२०२२ रोजी सदर प्रकरणात सापळापुर्व व सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आल्याचे पोनि इम्रान इनामदार यांनी मला सांगितले. त्याप्रमाणे श्री संजय सोनू मानभाव यांना देण्यासाठी मी माझेकडे असलेली रक्कम रू. ८०,०००/– घेवुन लाप्रवि, मुंबई कार्यालयास आलो व पुढे करण्यात येणाऱ्या सापळा कारवाईच्या अनुषंगाने मला पंचाना व सापळा पथक यांना पो नि इम्रान इनामदार यांनी सविस्तर माहिती दिली. त्यानंतर पो. ना. ०६.१५६२/सोनोने यांनी माझी अंगझडती घेतली. त्यानंतर पो.ना क्र.०१०५७७/कावले यांनी मी हजर केलेल्या लाचेच्या नोंटांना अँन्थ्रासिन पावडर लावणे, अँन्थ्रासिन पावडरचे उपयोग, गुणधर्म, प्रात्यक्षिक दाखविणे, लाचेच्या नोटा माझ्या पर्सच्या आत प्लॅस्टिकच्या पिशवीत ठेवणे, लाच स्विकृती नंतर इशारा करणे याबाबत योग्य त्या सुचना देवुन पंचासमक्ष कारवाई करून त्याबाबतचा पंचनामा केलेला आहे.

त्यानंतर मी, दोन पंच, पोनि इम्रान इनामदार, सपोआ कुंभार व पथकासह निघुन त्यांचे पोलीस वाहनाने श्री संजय मानभाव यांचे सह दुय्यम निबंधक कार्यालय, अंधेरी – ४, खार टेलिफोन एक्सचेंज, खार, मुंबई ५२ कार्यालयाचे जवळ आलो असता, थोडे आधी उतरून पोनि इम्रान इनामदार यांनी दिलेल्या सुचनांचे अनुषंगाने, त्यांनी चालु करून दिलेला व्हॉईस रेकॉर्डर पो.ना.क्र. ०४०३२१/यादव यांच्या मदतीने माझ्या शर्ट आतील बनियानला लावला. त्यानंतर मी व पंच चालत श्री संजय मानभाव सह दुय्यम निबंधक अधिकारी, अंधेरी ४, मुंबई या कार्यालयात गेलो. सदर कार्यालयात गेल्यावर माझे मागोमाग वर नमुद सापळा पथक ही नमुद कार्यालयात आलो. मी पंचासमक्ष एजंट कल्पेश गोळे व संदीप देवघरकर यांना भेटलो व माझ्या रजिस्ट्रेशन करण्याकरीता कागदपत्रे दिले. त्यावेळी एजंट संदीप देवघरकर यांनी मला पैसे आणलेत का असे विचारले असता, ठरल्याप्रमाणे ८०,०००/– रुपये आणल्याचे व ते पैसे रजिस्ट्रेशन झाल्यानंतर देतो असे त्यांनी मी सांगितले. तरीही ते मला पैशांची मागणी करु लागले. त्यावेळी त्यांना खात्री पटण्यासाठी मी आणलेले पैसे मोजण्यासाठी एजंट संदिप देवघरकर याला दिले. एजंट संदिप देवघरकर यांनी सदरचे पैसे मोजुन पुन्हा माझ्याकडे दिले. त्यानंतर काही वेळाने रजिस्ट्रेशन करण्यासाठी बिल्डर परवेज लकडावाला हे त्याठिकाणी आल्याने एजंट कल्पेश गोळे व संदिप देवघरकर यांनी मला व बिल्डरला रजिस्ट्रेशन करण्यासाठी श्री संजय मानभाव यांच्याकडे नेले. सदर ठिकाणी रजिस्ट्रेशन करुन व कागदपत्रांची पुर्तता झाल्यानंतर मला एजंट कल्पेश गोळे व संदिप देवघरकर हे कार्यालयाच्या खाली घेवुन आले. त्यावेळेस माझेसोबत पंच देखील हजर होते व त्यांनी माझ्याकडे पंचासमक्ष ठरल्याप्रमाणे पैशांची मागणी

Scanned with OKEN Scanner

केली. त्यावेळी मी माझ्या जिन्स पॅटच्या समोरील उजव्या खिशातुन रू. ८०,०००/— काढुन उजव्या हातने एजंट कल्पेश गोळे याचे उजव्या हातात दिली. सदरची रक्कम एजंट कल्पेश याने ती उजव्या हातातून त्यांच्या डाव्या हातात घेवुन त्यांच्या जिन्स पॅन्टच्या मागील डाव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवुन लाचेची रक्कम माझ्याकडुन स्विकारली. त्यानंतर मी लगेचच ठरलेला पुर्वनियोजित इशारा, डाव्या हातातील मनगटावरील घडयाळ काढुन मनगटावर फुंकर मारुन लाच स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजित इशारा केला, त्यावेळी माझ्या आजुबाजुला असलेले सापळा पथक व पंच तेथे हजर झाले व त्यांनी एजंट कल्पेश गोळे व संदिप देवघरकर यांचे दोन्ही हात पकडले व पथकातील पो नि इम्रान इनामदार यांचे सुचने नुसार पो. ना. ०४०३२१/यादव यांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर काढला जो पो नि इम्रान इनामदार यांनी बंद करुन त्यांच्या ताब्यात ठेवला.

थोडया वेळाने मला पो नि इम्रान इनामदार यांनी संजय मानभाव यांचे केबीनमध्ये बोलावले व मी दिलेल्या लाचेच्या रक्कमेच्या अनुषंगाने विचारणा केली, सदर वेळी श्री संजय मानभाव यांचे सांगणेवरुन एजंट कल्पेश गोळे याने लाचेची रक्कम स्विकारली असल्याचे सांगितले. सदरची हकिकत मी पंचा समक्ष सांगीतल्यानंतर मला पुन्हा बाहेर थांबण्याच्या सुचना दिल्या, त्यानंतर थोडया वेळाने पुन्हा आत बोलावुन माझे हातांची, कपडयांची अल्ट्राव्हाईट दिव्याखाली तपासणी केली. त्यांनतर पंचांसमक्ष पो. ना. ०६.१५६२/सोनोने यांनी माझी अंगझडती घेऊन माझ्या सामानाची अल्ट्राव्हाईट दिव्याखाली तपासणी करून माझे सामान परत दिले व मला हात धुवुन केबीनचे बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर पो नि इम्रान इनामदार यांनी सापळा पथकासह मी सदर कार्यालयाचे पहिल्या मजल्यावर असलेल्या अभ्यागत कक्षामध्ये आलो. तेथे आल्यावर पो नि इम्रान इनामदार यांनी मला पंचासमक्ष विचारणा केल्यावरुन मी, संजय मानभाव यांना लाच रक्कम देण्यासाठी रवाना केले पासुन संजय मानभाव यांनी लाच रक्कम स्विकारल्यानंतर मी इशारा करेपर्यंत घडलेली सर्व हकिकत सांगावी असे सांगितले त्यावर मी वरिलप्रमाणे हकिकत सांगितली. पडताळणी व सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक व माझ्यात वेळोवेळी झालेले संभाषण ऐकुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील ध्वनीमुद्रीत झालेल्या संभाषणाचे ट्रान्सक्रिप्ट तयार करण्यात आले.

एकंदरीत मागील दोन महिन्यापासुन माझ्या दोन खोल्यांच्या रजिस्ट्रेशन करण्याकरीता कागदपत्रांची पुर्तता करुन देखील सह दुय्यम निबंधक कार्यालय, अंधेरी ४, मुंबई येथील सह दुय्यम निबंधक श्री. संजय मानभाव यांनी एजंट कल्पेश गोळे व एजंट संदीप देवघरकर याच्यामार्फतीने माझ्याकडे १,००,०००/— रुपये इतक्या रक्कमेची लाचेची मागणी केली. मी दिलेल्या लेखी तक्रारीवरुन पंचासमक्ष दिनांक ०८/०९/२०२२, दिनांक. १२/०९/२०२२ व दिनाक १३/०९/२०२२ रोजी केलेल्या पडताळणीत एजंट कल्पेश गोळे व एजंट संदीप देवघरकर यांनी माझेकडे लाचेची मागणी केल्याचे व त्यास लोकसेवक संजय मानभाव यांनी दुजोरा दिल्याचे निष्पन्न झाले. तसेच दिनांक १५/०९/२०२२ रोजी केलेल्या सापळा कारवाई मध्ये लोकसेवक संजय सोनू मानभाव यांचे सांगणेवरुन एजंट कल्पेश गोळे व संदिप देवघरकर यांनी माझेकडुन रू ८०,०००/— लाच म्हणुन स्विकारली असता, सापळा पथकाने कल्पेश गोळे व संदिप दिवघरकर याला लाचेच्या रक्कमेसह रंगेहाथ पकडले आहे.

तरी लोकसेवक संजय सोनू मानभाव, सह दुय्यम निबंधक, अंधेरी ४, मुंबई, खाजगी एजंट कल्पेश दगडु गोळे व संदिप सदाशिव देवघरकर यांचेविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यासाठी माझी तक्रार देत आहे.

समक्ष,

(इम्रान इनामदार)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
बृहन्मुंबई विभाग, मुंबई

Scanned with OKEN Scanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ तात्काळ

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

........ —

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........ —

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........ —

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद वेळी व ठिकाणी तक्रारदार यांना रिडेव्हलपमेंट मधून मिळालेल्या दोन खोल्यांचे सह निबंधक, अंधेरी (पश्चिम) क्र.4 यांच्या कार्यालयातून रजिस्ट्रेशन करायचे होते. याकरीता ते मागील दोन महिन्यापासून प्रयत्न करीत होते. परंतु सदर कामकरीता लोकसेवक व खाजगी इसम हे लाचेची मागणी करीत असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी ला.प्र.वि. मुंबई येथे तक्रार दिली असता. पंचासमक्ष पडताळणी दरम्यान लोकसेवक हे दोन खाजगी इसमामार्फत लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले व नमुद [illegible], तारीख वेळी ~~[illegible]~~ लोकसेवकाने खाजगी इसमा मार्फत लाचेची रक्कम स्विकारली असल्याने गुन्हा नोंद

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पोलीस निरिक्षक इम्रान इनामदार, ला.प्र.वि. मुंबई.

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........, जिल्हा ........, राज्य ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)........ Rank........ No........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to........ (3) Transferred to P. S. ........ District........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

[signature]

14. तक्रारदारांची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

[signature]

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name इम्रान महमद इनामदार

पदनाम Rank पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.मुंबई.

तपासिक अं. चा कोड क्र. ........

Posting

Code No. of I. O. ........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख १६/०९/२२

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with OKEN Scanner